निशाणी क्र.२९

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – सागर भाऊसाहेब कोकरे,

वय – ३० वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार – देवगड फाटा, ता. नेवासा, जि. अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरू–**

१. दिनांक २३.०९.२०२० रोजी पोलीसांनी मला कुठेही बोलावले नव्हते. त्यांनी माझी देवगड फाटा येथे एका कागदावर सही घेतली. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनु.क्र. १ वर माझी सही आहे. सहीस **निशाणी क्र. ३०** देण्यात येते. त्यातील मजकूर मला माहित नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २३.०९.२०२० रोजी पोलीस उप निरिक्षक शेवाळे यांनी मला हत्यार जप्ती पंचनामा करण्याकरिता पोलीस ठाण्यात बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तेथे मला सांगितले की, आरोपीचा तलवार व पिस्टल सह फोटो व्हायरल झाला आहे, त्याच्यावर कारवाई करायची आहे, त्याकरिता पंच म्हणून तुम्ही हजर राहा. हे म्हणणे खरे नाही की, सदर दिवशी दुपारी १२.१५ वाजेच्या सुमारास मी, दुसरा पंच व पोलीस कर्मचारी सरकारी वाहन क्र. एम.एच. १७ ए.एन. ००५८ याने नेवासा फाटा येथून भेंडातून गेवराई कडे जाणा–या रस्त्याने गेवराई गावातील पिचडगाव रस्त्याच्या एक किलोमिटर अंतरावर उजव्या बाजूस १०० मिटर अंतरावर असलेल्या आरोपीच्या घराबाहेर गेलो. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपीस आवाज दिला असता तो बाहेर आला.

हे म्हणणे खरे नाही की, पोलीस उप निरिक्षक शेवाळे यांनी त्यास नाव गाव विचारले असता त्याने योगेश शिवाजी चावरे असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस उप निरिक्षक शेवाळे यांनी त्यास व्हायरल फोटो दाखवून तलवार व पिस्टल याबाबत विचारपूस केली. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा आरोपीने पिस्टल गणेश उगले याची परवानाधारक आहे असे सांगितले व तलवार त्याच्या शेडमध्ये खोचलेली आहे असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने पत्र्याच्या शेडमधून ॲन्गलला खोचलेल्या दोन तलवारी काढून दिल्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यातील एक तलवार ८ इंच पितळी नक्षीची पितळी मुठ व लाकडी म्यान असलेली, पितळी पत्रा असलेली ३२ इंच लांब असलेली टोकदार लोखंडी तलवार व दुसरी तलवार पितळी नक्षीची, पितळी मुठ व लाकडी म्यान असलेली, तीन पितळी पट्या, १७ इंच लांब पितळी साखळी ३२ इंच लांब पाते असलेली दिड इंच रूंदीची टोकदार लोखंडी तलवार होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी वरील दोन्ही तलवारी आरोपीच्या ताब्यातून माझ्यासमक्ष जप्त केल्या व त्याचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, तो मला वाचून दाखवल्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत दुसरा पंच संतोष जगन्नाथ गायकवाड हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होवू नये याकरिता आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड. ए. टी. आगळे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/-**

**(संध्या यु. सुळ)**

दिनांक-२९/०९/२०२५.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र.२),नेवासा